# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्थायी समिती सभा दि. ०५/०५/२००६

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा शुक्रवार दिनांक ०५/०५/२००६ रोजी सभा सुचना क्र. ०२ दि. २९/०४/२००६ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

### उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे | सभापती |
| २) | श्री. जयंत महादेव पाटील | सदस्य |
| ३) | श्री. मिलन गोविंदराव पाटील | सदस्य |
| ४) | श्री. सुर्यकांत अनंतराव भोईर | सदस्य |
| ५) | श्री. केशव रामभाऊ घरत | सदस्य |
| ६) | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| ७) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| ८) | श्रीम. प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |
| ९) | श्रीम. जानी कैलाशबेन दिनेशचंद्र | सदस्या |
| १०) | श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | सदस्य |
| ११) | श्री. रतन कृष्णा पाटील | सदस्य |

### गैरहजर सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मोहन मधुकर पाटील | सदस्य |
| २) | श्रीम. ग्रिटा स्टीफन फॅरो | सदस्या |
| ३) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |
| ४) | श्री. रमेश धरमचंद्र जैन | सदस्य |
| ५) | श्री. शफिक अहमद खान | सदस्य |

**मा. सभापती :-**

या सभेला उपस्थित असलेले उपआयुक्त श्री. बालाजी खतगावकर साहेब, सर्व उपस्थित असलेले सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या, मनपा अधिकारी वर्ग आणि मनपा कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे हार्दिक स्वागत करतो. आपण सर्वांनी ही सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडावी अशी अपेक्षा करतो आणि सभेला सुरुवात करावी अशी मी सचिवांना सुचना करतो.

(नगरसचिवांनी विषयपत्रिकचे वाचन केले.)

**जयंत पाटील :-**

मा. सभापती महोदय, या सभेला उपस्थित असलेल्या सर्व सन्मा. सदस्यांना सांगू इच्छितो की, भारतीय जनता पक्षाचे सरचिटणीस आणि ज्यांची भविष्यामध्ये या देशाच्या पंतप्रधान पदाकडे वाटचाल चाललेली होती. एक उत्कृष्ट प्रवक्ते, उत्कृष्ट संभाषण करणारे व महाराष्ट्राचे एक सुपुत्र श्री. प्रमोदजी महाजन यांचे परवा दुःखद निधन झाले. आपण सर्वजण त्या दुःखामध्ये सहभागी आहेत. तसेच त्यांच्या आत्म्यास शांती मिळण्यासाठी ही सभा दहा मिनिटासाठी तहकुब करावी असा मी ठराव मांडत आहे.

**गजानन भोईर :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**रतन पाटील :-**

तसेच चेना येथे टी.एम.टी.च्या बसचे ॲक्सीडन्ट झाल्यामुळे ३३ माणसे दगावली गेलेली आहेत.

**दुःखवटा ठराव क्र. १० :-**

भारतीय जनता पक्षाचे सरचिटणीस आणि ज्यांची भविष्यामध्ये या देशाच्या पंतप्रधान पदाकडे वाटचाल चाललेली होती. एक उत्कृष्ट प्रवक्ते, उत्कृष्ट संभाषण करणारे व महाराष्ट्राचे एक सुपुत्र श्री. प्रमोदजी

महाजन यांचे दुःखद निधन झाले. तसेच चेना येथे टी.एम.टी.च्या बसच्या झालेल्या अपघातात ३३ लोक मृत्युमुखी पडले. त्या सर्व मृतांच्या कुटूंबियांवर ओढवलेल्या दुःखात ही सभा सहभागी असून मृतात्म्यास चिरशांती मिळण्यासाठी ही सभा दहा मिनिटासाठी तहकुब करावी असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. जयंत पाटील.　　　　अनुमोदन :- श्री. गजानन भोईर.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

शोकप्रस्ताव झाल्यानंतर ही सभा दहा मिनिटांसाठी तहकुब करण्यांत येत आहे.

**सभा तहकुब झाल्याची वेळ :- सकाळी ११.१० वाजता.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**